# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

## २०१७-२०१८

शैक्षणिक सत्र २०१७—१८ च्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने या योजनेत सहभागी होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांची नामांकन प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण व्हावी, श्रमदानाचे भावना वाढीस लागावी, सेवाभाव निर्माण व्हावा तसेच ग्रामीण जिवनाशी त्यांचा परिचय होऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल माहिती मिळावी अशा विविध पैलुंशी विद्यार्थ्यांना परिचीत करण्यात आले. विविध माध्यमांद्वारे त्यांना प्रेरणा देण्यात आली.

**दि. २१ जुन २०१७**

मा. प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली योगदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक व प्रशिक्षक म्हणून मा. अनुप भारती आणि चमू यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. योग प्रशिक्षणाला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

**दि. १ जुलै २०१७**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार दोन कोटी वृक्ष लागवड व संवर्धनाच्या निमित्ताने महाविद्यालयाकडून वृक्ष दिंडी रॅली काढण्यात आली त्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**दि. ४ जुलै २०१७**

वृक्षरोपणाच्या निमित्ताने वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन मित्र मंडळ या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात गोंडवाना विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू मा. डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमात २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयीन परिसरात एकुण २० वृक्षांची लागवड करण्यात

आली. वृक्ष लागवडीकरीता व संवर्धनाकरीता प्रतिस्पर्धा घेण्यात आली त्यात १८० वृक्ष महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांना त्यांचे घरी वृक्षांची लागवड करण्याकरीता देण्यात आले व हे वृक्ष तीन वर्षाकरीता जोपासण्याची काळजी घेण्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले या निमित्ताने हि स्पर्धा संपन्न झाली.

**दि. १ ऑगष्ट ते १५ ऑगष्ट २०१७**

स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, महाविद्यालयीन परिसर स्वच्छता स्पर्धा, स्वच्छता रॅली इत्यादी कार्यक्रम या कालावधीत घेण्यात आले.

**दि. ५, ६ ऑगष्ट२०१७ :**

इको—प्रो संस्था आणि रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर शहरातील ब्रीटीशकालीन आणि गोंडराजांनी बांधलेले किल्ले, तसेच बुरूज आणि किल्ल्याच्या परकोटाच्या स्वच्छतेचे अभियान राबविण्यात आले. त्या दरम्यान विद्यार्थ्यांनी पुरातन वास्तुची स्वच्छता त्याचे जतन आणि संरक्षण का आणि कसे करायचे याबद्दल स्वत: आणि लोकांमध्ये जाणीव जागृती करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी.इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, इको—प्रो संस्थेचे अध्यक्ष श्री. बंडु धोत्रे आणि चमू, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे, प्रा. कुलदीप आर गोंड, प्रा.राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. संपुर्ण किल्लयाचा परकोट स्वच्छ केला.

**दि. १४ ऑगष्ट २०१७**

“स्वच्छ भारत” अभियानाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छतेविषयचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि स्वच्छ भारत अभियान समिती गठीत करण्यात आली.

अध्यक्ष: डॉ. आर. पी. इंगोले, उपाध्यक्ष : उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, सचिव : प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, सदस्य : पालक प्रतिनिधी : विठ्ठल मांडवकर, संजय काकडे,

विद्यार्थी/विद्यार्थीनी प्रतिनिधी : नयम मांडवकर, सागर परचाके, प्रणाली कवाडे, अंकिता वर्मा, सेवक : दशरथ डी. कामतवार.

**दि. १५ आगष्ट २०१७**

ध्वजारोहण कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.पी.इंगोले, उपप्राचार्य डॉ.स्वप्नील माधमेशेट्टीवार, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहनानंतर स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसर स्वच्छ केले.

**दि. १९ आगष्ट २०१७**

“आरोग्यासाठी स्वच्छ पर्यावरणाची गरज” या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकुण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**दि. २६ आगष्ट २०१७**

वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचा विषय होता. “स्वच्छतेसाठी युवा” यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला त्यामध्ये ३ विद्यार्थ्यांना क्रमांक देवून गौरव करण्यात आला.

**दि. २८ ऑगष्ट २०१७**

महा अवयवदान अभियानाअंतर्गत महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयीनस्तरावर करण्यात आले. या स्पर्धांमध्ये क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना दि. २९ ऑगष्ट रोजी शासकिय वैद्यकीय महाविद्यालयात समारोपीय झालेल्या कार्यक्रमात बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

**दि. २९ ऑगष्ट २०१७**

महा अवयवदान जनजागृती रॅली मध्ये मानवी साखळी तयार करण्याकरीता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी सहभाग घेतला. सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

आर. पी. इंगोले, रासेयो प्रमुख प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार उपस्थित होते.

**दि. ९ सप्टेंबर २०१७**

राष्ट्रीय सेवा योजेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वर्ग खोल्या आणि वऱ्हाडयांची स्वच्छता केली व वर्ग सजावट केली.

**दि. १५ सप्टेंबर २०१७**

चंद्रपूर महानगरपालीका आणि इतर स्वयंसेवी संस्था यांचेवतीने आयोजित स्वच्छ भारत रॅलीमध्ये रासेयोच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**दि. १६ सप्टेंबर २०१७**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालया बाहेरील परिसर स्वच्छ करून इतर विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याच्या दृष्टिने मोलाचे कार्य केले.

**दि. २४ सप्टेंबर २०१७**

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आर. पी. इंगोले यांचे अध्यक्षतेखाली स्वयंसेवकांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला रासेयो चे सर्व सदस्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि स्वयंसेवक भरपूर संख्येने उपस्थित होते.

**दि. २५ सप्टेंबर २०१७**

राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे वाहतुक नियंत्रण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, आय. पी. वाहतुक शाखा श्री. एस. पी. चव्हाण, श्री. अशोक कोळी, पी. वाय. वेलफेअर, पोलीस बॅन्ड पथकावर राष्ट्रगीतासह इतरही देशभक्तीवरील गीत बॅन्ड पथकाच्या ध्वनीवर सादर केले. या कार्यक्रमात श्री. एस. चव्हाण यांनी वाहतुकीचे नियम पाळणे

याचप्रमाणे सायबर क्राईम आणि महिलांची सुरक्षितता या विषयावर सखोल माहिती दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**दि. ०२ आक्टोंबर २०१७**

गांधी जयंती व लालबहादूर शास्त्रर जयंती निमित्य महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता करून रॅली काढण्यात आली. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, प्रभारी प्रंबधक श्री. मोहन वनकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रकाश शेन्डे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उमाकांत गुरू, कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छता, काळाची गरज, मुलद्यौगी शिक्षण नागरीकरण आदी विषयावर मार्गदर्शन केले. तसेच महात्मा गांधीनी आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्व देवून स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दि. २६ नोव्हेंबर २०१७**

संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतीमेला माल्यार्पण करून संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सर्वांसमोर केले. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकुन भारताचे संविधान किती मौल्यवान आणि प्रेरणादायी आहे हे समजवून सांगीतले कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद इत्यादी उपस्थित होते.

**दि. ०१ डिसेंबर २०१७**

एड्स जनजागृती दिनाच्या निमित्ताने एड्स जनजागृती रॅली शासकीय सामान्य रूग्णालयाच्यावतीने काढण्यात आली. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.

कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

**दि. ०६ डिसेंबर २०१७**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वान दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी.इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रतीमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वान दिनानिमित्त एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**दि. ०८ डिसेंबर २०१७**

रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व एच.डी. एफ.सी.बॅक यांचे संयुक्त विद्यमान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे स्व. अब्दुल शफी सभागृहामध्ये घेण्यात आले. या शिबिरात ४० स्वयंसेवकांनी रक्तदान केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे, प्रा. कुलदीप गोंड व रासेयो चे स्वयंसेवक उपस्थित होते

**दि. ३ जानेवारी २०१८**

सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, व सावित्रीबाई फुले यांचेवरील भाषणे झालीत त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, रासेयो चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक इत्यादी उपस्थित होते.

**दि. २९ जानेवारी २०१८ ते ४ फेब्रुवारी २०१८**

राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आयोजन या कालावधीमध्ये करण्यात येवून या शिबिराचे उद्घाटन सोमवार दि. २९ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वा. राष्ट्रीय शारिरीक

शिक्षण महाविद्यालय, विसापूर येथे झाले. या उद्‌घाटन शिबिराचे उद्‌घाटक गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एन. व्ही. कल्याणकर यांचे शुभहस्ते विद्यापीठ व महाविद्यालयाचे ध्वजारोहन करून शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. रमेशपंत मामीडवार, प्रमुख अतिथी म्हणून राजूराचे, माजी आमदार, मा. श्री. सुदर्शन निमकर, एव्हीबीपी विदर्भ प्रांत चे सहमंत्री मा. श्री. रघुविर अहीर, आर.एस.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. दिलीप जयस्वाल, विसारपूरच्या सरपंच रिताताई जिलटे, श्री.हरीशजी गेडाम, श्री. गोविंदजी पोडे, श्रीमती विद्याताई गेडाम, श्री. दिलीपभाऊ खैरकर, श्री. एल. वाय. पोवरे, मा. डॉ. अश्विनी बेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, गोंडवाना विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम समन्वयक डॉ. नरेश मडावी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, एस. बी. कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रमुख प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयू पोतनुरवार, प्रा. संजय गर्गेलवार, डॉ. विजय सोमकुंवर, डॉ. नत्थु गिरडे, डॉ. शशिकांत गेडाम, डॉ. विजया गेडाम उपस्थित होते. शिबिराच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यस्तरीय विशेष शिबिरातील व महाविद्यालयीन विशेष शिबिरातील एकुण ३०० स्वयंसेवकांनी शिबिराचे उद्‌घाटक व अन्य अतिथी यांना मानवंदना दिली व श्री. अमोल कांबळे व स्वयंसेवकांनी स्वच्छतेविषयी शपथ घेतली.

**<u>दि. ३० जानेवारी २०१८</u>**

रासेयोच्या स्वयंसेवकांनी ३० जानेवारी या दिवशी वर्धा नदीवर १०० ते १२५ मीटरचा बांधारा बांधण्याचे कार्य सुरू केले या बंधाऱ्याचे कार्य एकुण दोन दिवस चालणार होते. या बंधाऱ्याकरीता पहिल्या दिवशी एकुण २००० रेतीच्या बोरी भरून तीन लेअर पर्यत कार्य करण्यात आले. या बंधाऱ्या मुळे विसापूर नागरीकांचा पाण्याचा भीषण प्रश्न सुटणार असे कार्य सुरू करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, विसापूरचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, विसापूरचे नागरीक तसेच रासेयो चे कार्यक्रम अधिकारी व शिबिरातील ३०० स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

यावेळी बौद्धिक सत्रात डॉ. दिलीप बारसागडे यांचे "आर्थिक नियोजन व वित्तीय साक्षरता" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. ए. चंद्रमौली हे बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

**<u>दि. ३१ जानेवारी २०१८</u>**

वर्धा नदीवरील बंधारा दोन दिवसात १०० ते १२५ मीटरचा बांधारा बांधून या नदीचा प्रवाह विसापूर गावाकडे वळता करण्यात आला. यामुळे विसापूर गावातील पाण्याचा भिषण प्रश्न ३१ जानेवारी २०१८ रोजी सोडविण्यात आला. या बंधाऱ्यामुळे विसापूर ग्रामस्थांचा पाण्याचा भीषण प्रश्न स्वयंसेवकांनी अथक परिश्रमाने सोडविलेला आहे. याकरिता स्वयंसेवकांनी दोन दिवस अथक परिश्रम केले व त्याच्या परिश्रमाला यश प्राप्त झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, विसापूरचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, विसापूरचे नागरीक तसेच रासेयो चे कार्यक्रम अधिकारी व शिबिरातील ३०० स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

बौद्धिक सत्रात डॉ. योगेश दुधपचारे यांनी "स्वच्छता आणि पर्यावरण" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर "व्यक्तीमत्व विकासावर" प्रा. शाम धोपटे यांनी अनेक उदाहरण देऊन मुलांना अमुल्य असे मार्गदर्शन केले.

**<u>दि. १ फेब्रुवारी २०१८</u>**

कारवा या १००% आदीवासी गावामध्ये जाऊन शिबिरार्थ्यांनी स्वच्छता, नाली सफाई, शाळा परिसर स्वच्छता करून श्रमदान केले व गावाचे सर्वेक्षण करून त्या गावातील समस्या समजावुन घेतले आणि आश्रम शाळेला भेट देऊन आपले दायीत्व पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

बौद्धिक सत्रात व्ही. एन. आय.टी. महाविद्यालय, नागपूर येथील प्रा. डॉ. दिलीप पेशवे यांनी "सामाजिक जाणिवा" या विषयावर विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले आणि अनेक संस्थांचे उदाहरण देऊन मुलांना समाजात कोणत्या भिषण समस्या उद्‌भवत असतात याबाबत अवगत केले आणि अनेक संस्थांसोबत त्यांनी करत असलेल्या कार्यांचा परिचय दिला. डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार हे या उद्‌बोधन वर्गाचे अध्यक्ष होते.

**<u>दि. २ फेब्रुवारी २०१८</u>**

विसापूर गावामध्ये स्वयंसेवकांनी स्वच्छता केली विशेषत: श्रमदानाद्वारे विविध विषयांवर नालीचे खोदकाम केले तसेच विविध विषयांवर स्वच्छता, एड्स, मासीक पाळी यावर पथनाटयाद्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षणाचे कार्य करून ग्रामस्थांच्या समस्या जाणुन घेण्यात आल्या.

बौद्धीक सत्रात चंद्रपूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. देवराव भोंगळे यांचे “ग्रामविकासासाठी शासकीय योजना” या विषयावर अतिशय वास्तववादी उद्‌बोधन केले. या दरम्यान शिबिरार्थ्यांनी काही प्रश्न उपस्थित केले आणि त्या प्रश्नांचे उत्तराचे समाधान श्री.देवराव भोंगळे यांनी केले. या बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विजय सोमकुंवर हे यावेळी उपस्थित होते.

**<u>दि. ३ फेब्रुवारी २०१८</u>**

मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन वृद्धांना फळे वाटप केली. त्यांचेशी संवाद साधला, हितगुज केले आणि आपल्या आप्तांना वृद्धाश्रमात पाठविणार नाही अशी शिबिरार्थीनी शपथ घेऊन ओल्या डोळयांनी वृद्धांना निरोप दिला.

बौद्धिक सत्रात श्री. गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय, कुरखेडा येथील प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या अध्यक्षतेखाली “आमचे गाव आम्ही सरकार” आणि “व्यक्तिमत्व विकासावर” कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोंडपिपरीचे प्राचार्य डॉ. शाम मोहरकर यांनी मार्गदर्शन केले.

**<u>दि. ४ फेब्रुवारी २०१८ रोजी</u>**

या दिवशी राज्यस्तरीय व महाविद्यालयीन विशेष शिबिराचा समारोपीय कार्यक्रम सकाळी १०.०० वा. विसापूर येथे आयोजित करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष गोंडवाना विद्यापीठाचे प्र—कुलगुरू मा. डॉ. चंद्रशेखर भुसारी, विशेष अतिथी म्हणून केंद्रिय गृहराज्यमंत्री भारत सरकार मा. श्री. हंसराज अहीर, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. चंदनसिंग चंदेल, अध्यक्ष, फॉरेस्ट डिपार्टमेंट, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. राहुल सराफ, जिल्हा महामंत्री, भाजपा, चंद्रपूर, सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव श्री. प्रशांत पोटदुखे, श्री. रघुविर अहीर, सहमंत्री, विदर्भ प्रांत ए.बी.व्ही.पी., डॉ.

नरेश मडावी, संचालक, रासेयो गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मा. सौ. रिताताई जिलटे, सरपंच, ग्रामपंचायत विसापूर, मा. श्री. सुनिल रोंगे, उपसरपंच, डॉ. दिलीप जयस्वाल, प्राचार्य, शारिरीक शिक्षण महाविद्यालय, विसापूर, सदस्य श्री. अशोक थेर, महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, विसापूर गावकरी उपस्थित होते. यावेळी श्री. कार्यक्रमाचे विशेष अतिथी मा. ना. हंसराज अहिर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, "शिक्षणासोबत विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे असे प्रतिपादन केले. मा. हंसराज अहिर यांच्या हस्ते उत्कृष्ठ शिबिरार्थी, उत्कृष्ठ स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना पारितोषीत देवून गौरविण्यात आले. शिबिराच्या यशस्वीततेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, प्रा. संजय गर्गेलवार, डॉ. विजय सोमकुंवर, डॉ. शशिकांत गेडाम, श्री. दशरथ कामतवार, श्री. हनुमंता डंबारे, श्री. राजाभाऊ इंगोले, श्रीमती प्रमिला सोरते, श्रीमती शशिकला पारधी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेवीका यांनी विशेष परिश्रम घेतले.

दि. २९ जानेवारी २०१८ ते ४ फेब्रुवारी २०१८ या दरम्यान घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तसेच महाविद्यालयीन विशेष शिबिराचा दैनिक कार्यक्रम असा होता.

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ०४.०० ते ७.३० | जागर, प्रार्थना, व्यायाम, योगासने |
| | ०७.३० ते ८.०० | अल्पोपहार, चहा |
| | ०८.०० ते ११.०० | श्रमसंस्कार |
| | ११.०० ते १२.०० | स्नान |
| दुपारी | १२.०० ते ०१.०० | भोजन |
| | ०१.०० ते २.०० | विश्रांती |

| | | |
|---|---|---|
| | ०२.०० ते ०३.०० | दैनंदीन डायरी भरणे |
| | ०३.०० ते ०५.०० | बौद्धिक कार्यक्रम |
| | ०५.०० ते ०५.३० | खेळ |
| सायंकाळी | ०५.३० | प्रार्थना |
| रात्री | ०७.०० ते ०९.३० | सांस्कृतिक व जणजागृतीपर कार्यक्रम |
| | ०९.३० | भोजन व विश्रांती |

**<u>दि. २१ फेब्रुवारी २०१८ रोजी</u>**

परमपूज्य रामदेव बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या महिला महासंम्मेलनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या मोटरसायकल रॅलीमध्ये आणि महासम्मेलनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनींनी सक्रीय सहभाग नोंदविला.

**<u>दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी</u>**

“आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी ११.०० वा. स्व. शालिकग्राम गवालपंछी सभागृह येथे घेण्यात आला. या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव मा.श्री. प्रशांत पोटदुखे, प्रमुख अतिथी मा. श्री. निलेश तेलतुंबडे, व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नीलमाधमशेट्टीवार यांचे उपस्थितीत पार पडला. या कार्यशाळेत वीज, पूर, आग, या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. “जल समस्या व जलसंवर्धन” याविषयावर डॉ. योगेश दुधपाचारे यांनी स्वयंसेवक व स्वयंसेवीकांना मोलाचे मार्गदर्शन केले व याकरिता १०० रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रमात डॉ. योगेश दुधपचारे, जनता महाविद्यालय, चंद्रपूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ.

योगेश दुधपचारे यांचे हस्ते स्वयंसेवकांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यशाळे च्या यशस्वीतेकरीता डॉ. विजय सोमकुंवर, खेळ विभाग प्रमुख, कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, श्री. हनुमंतू डंबारे व रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी अथक परिश्रम घेतले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (प्रा. कुलदीप आर. गोंड)<br>कार्यक्रम अधिकारी | (डॉ. उषा खंडाळे)<br>कार्यक्रम अधिकारी | (डॉ. आर. पी. इंगोले)<br>प्राचार्य |

# सत्र २०१७–२०१८

**Department of National Service Scheme**
**Represented University, State & National Level Camp**
**2017-2018**



Mr. Nayan Mandoakar
State Camp



Mr. Rajesh Hajare
State Camp



Mr. Suraj Dahagaokar
State Camp



Mr. Suraj Balki
State Camp



Mr. Nikhil Bhoyar
State Camp



Mr. Sheikh Ijaj
State Camp



Mr. Amol Kamble
State Camp



Mr. Shivaji Ade
State Camp



Mr. Md. Naim Sheikh
State Camp



Mr. Irfan Chand Sheikh
State Camp



Mr. Nitin Burande
State Camp



Mr. Rohit Mohurle
State Camp

## Department of National Service Scheme
## Represented University, State & National Level Camp
## 2017-2018


Ku. Ruchita Kottur
State Camp


Ku. Ankita Varma
State Camp


Ku. Pratima Yadav
State Camp


Ku. Sapna Gaikwad
State Camp


Ku. Aruna Jadhav
State Camp


Ku. Rama Gottewar
State Camp


Ku. Mitali Muppidwar
State Camp


Ku. Shubhangi Ekre
State Camp


Ku. Divya Kale
State Camp


Ku. Pranali Kawade
State Camp


Ku. Swati Kavale
State Camp


Ku. Apeksha Gote
State Camp

## Department of National Service Scheme
## Represented University, State & National Level Camp
## 2016-2017



Ku. Geeta Dehariya
State Camp



Ku. Tanvi Choubey
State Camp



Ku. Sonali Pandey
State Camp



Ku. Maheshwari Bhagat
State Camp



Ku. Deepa Dey
State Camp



Ku. Urwashi Karande
State Camp



Mr. Shubham Bannewar
State Camp



Mr. Sagar Parchake
State Camp



Mr. Santosh Chillarwar
State Camp



Mr. Rohit Chiwande
State Camp



Ku. Dhanvarsha Nagose
state camp



Mr. Gajanan Nikode
State Camp



दि. २१ जून २०१७ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिवस पर योग प्रशिक्षण देतांना श्री. अनुप भारती



दि. २१ जून २०१७ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिवस पर योग करतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत प्राध्यापकवृंद व रासेयो चे स्वयंसेवक




दि. ४ जुलै २०१७ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले



दि. ४ जुलै २०१७ रोजी वृक्षारोपण करतांना गोंडवाना विद्यापीठाचे माजी. कुलगुरू मा. डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत अन्य मान्यवर



दि. १ जुलै २०१७ रोजी चंद्रपूर महानगरपालीका चंद्रपूर द्वारा आयोजित वृक्षदिंडी रॅलीत सहभाग घेतांना रासेयो चे कार्यक्रम अधिकारी व स्वंयसेवक




दि. २८ ऑगस्ट २०१७ रोजी महा अवयवदान रॅलीत सहभाग घेतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक




दि. २ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता पखवाडा कार्यक्रमात स्वच्छता रॅलीत सहभाग घेतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक




दि. ५ व ६ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता पखवाडा कार्यक्रमाअंर्तगत गोंडराजाचे किल्ले, बुरूज आणि किल्याच्या परकोटाची स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, कार्यक्रम अधिकारी, रासेयोचे स्वयंसेवक



दि. ५ व ६ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता पखवाडा कार्यक्रमाअंर्तगत गोंडराजाचे किल्ले, बुरूज आणि किल्याच्या परकोटाची स्वच्छता केल्यानंतर रासेयोचे स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत इको–प्रो संस्थाचे अध्यक्ष श्री. बंडू धोत्रे, कार्यक्रम अधिकारी



दि. ५ व ६ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता पखवाडा कार्यक्रमाअंर्तगत गोंडराजाचे किल्ले, बुरूज आणि किल्याच्या परकोटाची स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे रासेयोचे स्वयंसेवक




दि. २४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस पर स्वयंसेवकांना सपथ देतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत कार्यक्रम अधिकारी



दि. २४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस पर सपथ घेतांना स्वयंसेवक



दि. २ ऑक्टोंबर २०१७ रोजी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती कार्यक्रमात
प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापकवृंद




दि. १ डिसेंबर २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय एड्स दिवस रॅलीत सहभाग घेतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक






दि. ८ डिसेंबर २०१७ रोजी रक्तदान करतांना रासेयोचे स्वयंसेवक सोबत
प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले व कार्यक्रम अधिकारी



दि. २९ जाने. २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एन. व्ही. कल्याणकर सोबत मान्यवरांना मानवंदना देतांना शिबिरार्थी




दि. २९ जाने. २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एन. व्ही. कल्याणकर, सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री रमेशपंत मामीडवार




दि. २९ जाने. २०१८ रासेयो राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिबिरार्थ्यांना स्वच्छतेच्या शपथ देतांना गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. एन. व्ही. कल्याणकर सोबत सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री रमेशपंत मामीडवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले



दि. २९ जाने. २०१८ रोजी रासेयो राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिरच्या उद्घाटन प्रसंगी स्वच्छतेची शपथ घेतांना शिबिरार्थी






दि. ३० जाने. ते ३१ जाने. २०१८ या कालावधीत विसापूर गावाच्या वर्धा नदिवर बंधारा बांधतांना रासेयोचे राज्यस्तरीय व महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी





दि. ३० जाने. ते ३१ जाने. २०१८ या कालावधीत विसापूर गावाच्या वर्धा नदिवर बंधारा बांधतांना रासेयोचे राज्यस्तरीय व महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी




दि. ३० जाने. ते ३१ जाने. २०१८ या कालावधीत विसापूर गावाच्या वर्धा नदिवर बंधारा बांधतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, गोंडवाना विद्यापीठाचे रासेयोचे संचालक डॉ. नरेश मडावी, कार्यक्रम अधिकारी, सरपंच सौ रिताताई जिलटे व रासेयो राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराचे शिबिरार्थी



दि. ३० जाने. ते ३१ जाने. २०१८ या कालावधीत विसापूर गावाच्या वर्धा नदिवर बंधारा बांधतांना स्वयंसेवकांना मदत करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले



दि. ३१ जाने. २०१८ रोजी राज्यस्तरीय व महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सीने एक्टर श्री रविन्द्र धकाते




दि. १ फेब्रुवारी २०१८ रोजी कारवा गावात आश्रम शाळेत भेट देतांना ग्रामपंचायतचे सदस्य श्री अशोक देठे, कार्यक्रम अधिकारी व शिबिरार्थी





दि. २९ जाने. ते ४ फेब्रु. २०१८ या कालावधीत विसापूर गावात स्वच्छता करतांना राज्यस्तरीय व महाविद्यालयीन
विशेष शिबीराचे शिबिरार्थी



दि. ४ फेब्रु. २०१८ रासेयो राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात येतांना मा. ना. श्री. हंसराज अहीर केन्द्रीय गृहराज्यमंत्री भारत सरकार सोबत गोंडवाना विद्यापीठाचे प्र–गुलकुरू डॉ. चंद्रशेखर भूसारी, प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले




दि. ४ फेब्रु. २०१८ रोजी रासेयो राज्यस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. ना. श्री. हंसराज अहीर केन्द्रीय गृहराज्यमंत्री भारत सरकार सोबत गोंडवाना विद्यापीठाचे प्र–गुलकुरू डॉ. चंद्रशेखर भूसारी, प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले




दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत प्रशिक्षक श्री शशीकांत मोकासे, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार व अन्य मान्यवर




दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतांना श्री शशीकांत मोकासे




दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळेत प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नीलमाधमशेटटीवार, श्री. शशिकांत मोकासे, प्रा. कुलदिप आर. गोंड सोबत रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका



दि. २८ फेब्रुवारी २०१८ रोजी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळेत अभ्यास करतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत प्रा. कुलदिप आर. गोंड